# ई - पोलीस पत्रिका

दि१५/०२/२०२४ अनु.क्र.३२

## (अमरावती शहर पोलीसांची२०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्यकरू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## पदोन्नती

**०१.पोआअ/आस्था-प्रलि/पोहवा तेसपोउपनि पदोन्नती/१४२५/२०२४अमरावती शहर दिनांक ०८/०२/२०२४**

### आदेश

पोलीसआयुक्त, अमरावती शहर आस्थापेनरील खालील नमुद पोलीस हवालदार (अराजपत्रीतगट-क)यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांक:-बीसीसी२०१८/प्र.क.३६६/१६-ब,दिनांक०७.०५.२०२१अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून दिनांक २५.०५.२००४ रोजीच्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने खालील अटीचे अधिन राहून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (अराजपत्रीतगट-क) या पदावर वेतन संरचना वेतन स्तरएस-१०,रु.२९२००-९२३००/-मध्ये आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांका पासून तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | विशेषवेतन |
|---|---|---|
| सहाय्यकपोलीसउपनिरीक्षक | एस-१०,रु.२९२००-९२३००/- | --- |
| पोलीसहवालदार | एस-९,रु.२६४००-८३६००/- | विशेषवेतनरु.७५०/- |

| अ.क्र. | पदनाम | ब.क्र. | अंमलदाराचेनांव | जात/ प्रवर्ग | पदोन्नतीदिलेलाप्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोहवा | ११०४ | राजेंद्र शामराव करमरकर | महार /अनु.जाती | ज्येष्ठतेनुसारखुला |
| २. | पोहवा | ८९४ | संजय दिनकरराव भुगांवकर | वाणी/ इ.मा.व. | ज्येष्ठतेनुसारखुला |

उपरोक्त पोलीस अंमलदारा विरुध्द विभागीय चौकशी/प्राथमिक चौकशी सुरु असेल किवा न्यायालयात खटला चालू असेल किवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णया विरुध्द वरीष्ठन्यायालयात अपिलप्रलंबित असेल किवा ते एखादी शिक्षा भोगत असतीलतर त्यांना पदोन्नतीन देता सविस्तर अहवालया कार्यालयास तात्काळ सादर करावा. तसेच वरील प्रमाणे पदोन्नती दिल्या नंतर मागावून कोणतीही प्रतिकुल बाबनिदर्शनास आल्यास संबधित अंमलदारास देण्यात आलेल्या पदोन्नतीचे पदावरुन तात्काळ पदावनत करण्यात येईल. तसेच उपरोक्त अंमलदारांपैकी ज्या अंमलदारांनी मार्च २०२३ अखेरचे मत्ता व दायीत्व विवरणपत्र या कार्यालयास सादर केलेले नाहीत. अशा पोलीस अंमलदार यांनी तात्काळ मत्ता व दायीत्व विवरणपत्र सादर करावे.

**०२.पोआअ/आस्था-प्रलि/पोनाते पोहवा पदोन्नती/१६२४/२०२४अमरावती शहर दिनांक १४/०२/२०२४**

### आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापेनरीलखालील नमुद पोलीस नाईक (अराजपत्रीतगट-क) यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक :- बीसीसी २०१८/प्र.क.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिकाक्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून दिनांक २५.०५.२००४ रोजीच्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनेखालील अटीचे अधिन राहून पोलीस हवालदार (अराजपत्रीतगट-क) या पदावर वेतन संरचना वेतन स्तर एस-९, रु.२६४००-८३६००/- अधिक विशेष वेतन रु.७५०/- मध्ये आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासूनतात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | विशेष वेतन |
|---|---|---|
| पोलीस हवालदार | एस-९, रु.२६४००-८३६००/- | विशेष वेतन रु. ७५०/- |
| पोलीस नाईक | एस-८, रु.२५५००-८११००/- | विशेष वेतन रु. ७५०/- |

| अ.क्र. | पदनाम | ब.क्र. | पोलीस अंमलदाराचे नाव | जात/प्रवर्ग | पदोन्नती दिलेला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोना | ऐसीबी प्रतिनियुक्ती | राजेश वासूदेवराव कोचे | महार/ अजा | जेष्ठतेनुसारखुला |
| | पोना | ३३४ | मंगेश बाबाराव परीमल | कुणबी/ इमाव | जेष्ठतेनुसारखुला |
| २ | पोना | विदेश मंत्रालय प्रतिनियुक्ती | विशाल अंबादास यादव | अहिर/ भजक | जेष्ठतेनुसारखुला |
| | पोना | ३७९ | संतोषसुपाजी गवळी | गोंधळी/ भज ब | जेष्ठतेनुसारखुला |
| ३ | पोना | १६० | दिनेश मनोहर दर्यापुरकर | ब्राम्हण/ खुला | जेष्ठतेनुसारखुला |
| ४ | पोना | १२५३ | उल्हास अ. टवलारे | माळी/ इमाव | जेष्ठतेनुसारखुला |

उपरोक्त पोलीस अंमलदाराविरुध्द विभागीय चौकशी/ प्राथमिक चौकशी सुरु असेल किवा न्यायालयात खटला चालू असेल किवा न्यायालयाने दिलेल्या इतर निर्णयाविरुध्द वरीष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल किवा ते एखादी शिक्षा भोगत असतीलतर त्यांना पदोन्नती न देता सविस्तर अहवाल या कार्यालयासतात्काळसादर करावा. तसेच वरील प्रमाणे पदोन्नती दिल्यानंतर मागावून कोणतीही प्रतिकुल बाब निदर्शनास आल्यास संबधित अंमलदारास देण्यात आलेल्या पदोन्नतीचे पदावरुन तात्काळ पदावनत करण्यात येईल.तसेच उपरोक्त अंमलदारांपैकी ज्या अंमलदारांनी मार्च २०२३ अखेरचे मत्ता व दायीत्व विवरणपत्र या कार्यालयाससादरकेलेले नाहीत.अशा पोलीस अंमलदार यांनीतात्काळ मत्ता व दायीत्व विवरणपत्र सादर करावे.

## बदली

**०१.पोआअश/प्रलि-पशा/पोउपनि-शिंदे/हजर/१२२६/२०२४अमरावती शहर दिनांक ०३/०२/२०२४**

## आदेश

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन आदेशक्रमांक : आयपीएस-२०२३/प्र.क्र. ३५२/दोन/पोल-१ दिनांक २०/११/२०२३ तसेच पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक : पोमसं/१/बदली/२९/०८/२०२३

दिनांक २१/११/२०२३ अन्वये भा.पो.से. / रा.पो.से.अधिका-यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापनाकरण्यात आली आहे.

| | आदेशातील अ.क्र. | रा.पो.से. पोलीस अधिकारी यांचे नाव | बदली पूर्व नेमणुकीचे ठिकाण | बदलीवर पदस्थापना ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | १३ | श्री. गणेशशिंदे | अपर पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे | पोलीस उप आयुक्त, अमरावती शहर |

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई यांचे आदेशक्रमांक : पोमसं/लोह/आस्था-१/पोलीस अधिक्षक/२०२२ दिनांक ११/१२/२०२३ अन्वये श्री. गणेशशिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे यांना बदली ठिकाणीहजरहोण्याकरीता दिनांक १२/१२/२०२३ चे म.नंतरकार्यमुक्तकरण्यात आले आहे.

श्री.गणेशशिंदे, पोलीस उप आयुक्त, हे पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकात दिनांक ०३/०२/२०२४ चे म.पूर्व बदली होण्याकरीता आले आहेत. श्री.गणेशशिंदे, पोलीस उप आयुक्त, यांना या घटकात बदलीवर हजर करुन घेण्यात येत असुनत्यांची पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, अमरावती शहर अशी नेमणुककरण्यात येत आहे.

श्री.सागर पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांनीत्यांचेकडे अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त , परिमंडळ-२ यांनीत्यांचेकडे सोपविण्यात आलेला पोलीस उप आयुक्त , परिमंडळ-२ या पदाचा कार्यभार श्री. गणेशशिंदे, पोलीस उप आयुक्त, यांचेकडेहस्तांतरीत करावा.

श्री.गणेशशिंदे, पोलीस उप आयुक्त, यांनी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ अमरावती शहर या पदाचा कार्यभार हस्तांतरण करुन कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र ०४ प्रतीत या कार्यालयाससादर करावे.

**०२.पोआअ/पशा-१/पोउपनि-जाधव/हजर/१२५३/२०२४अमरावती शहर दिनांक ०५/०२/२०२४**

## आदेश

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेशक्रमांक : पोमसं/५/१०/७/पोउपनि-सार्वत्रिक बदल्या -२०२३/५६/२०२३ दिनांक ३०.०६.२०२३ अन्वये नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षकांची त्यांच्या नावासमोर नमुद ठिकाणी बदली करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगानेखालीलनमुद पोलीस उप निरीक्षकहे अमरावती शहर घटकांतत्यांचे नावासमोर नमुद दिनांकास बदलीवर हजर झाले आहेत.

| अ.क्र | आदेशातील ा अ.क्र. | पोलीस उप निरीक्षक यांचे नाव | पूर्वीचे नेमणुकीचे ठिकाण व कार्यमुक्त दिनांक | अमरावती शहर येथे बदलीवर हजर झाल्याचा दिनांक व नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २४३ | श्री अजय | पोलीस आयुक्त | अमरावती शहर येथेहजर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मुलचंदजाधव | नागपूरशहर येथून दि. ३०.०१.२०२४ रोजी म.नं कार्यमुक्त | दिनांक ०१.०२.२०२४ रोजी म. पुर्व **नेमणुक - पो.स्टे. सीटी कोतवाली, अमरावती शहर** |

श्री अजय मुलचंद जाधव, पोलीस उप निरीक्षक यांना या घटकात बदलीवर हजर करुन घेण्यात येत असुनत्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणीतात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशापर्यत नेमणुककरण्यात येत आहे. त्यांनी नेमणुकीचे ठिकाणीतात्काळहजरहोऊन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयाससादर करावा.

## प्रशिक्षण

**०१. पोआअ/पशा-१/MIA/F&T/१४६९/२०२४अमरावती शहर दिनांक ०९/०२/२०२४**

**संदर्भ :-**विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे यांचे बिनतारी संदेश
O. NO MIA/TRG/FEB/F & T Course No. ०४/२४/३८८ दि. ३०.०१.२०२४

**विषय :-**Fundamental & Terrorism, Course No. ०४/२०२४ या प्रशिक्षणासाठीपोलीस अधिकारी पाठविणेबाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे**Fundamental & Terrorism** या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजनकेलेले आहे. अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद अधिकारी यांचीसदरचे प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात येत आहे.

| प्रशिक्षणकेंद्राचे नाव | प्रशिक्षण दिनांक | अधिका-याचे नांवे | नेमणुक |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | १२.०२.२०२४ ते १६.०२.२०२४ | श्री. तुषार गावंडे पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. बडनेरा, अमरावती शहर |

उपरोक्त प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण शुल्क प्रत्येकी रु. ७५००/- आकारण्यात आलेला आहे. सदर प्रशिक्षण शुल्क प्रशिक्षण निधी मधुन मंजुरकरण्यात येत आहे.

**<u>प्रशिक्षणकेंद्रात जाण्यापुर्वी त्याबाबतचे नियम व अटीखालील प्रमाणे :-</u>**

१. उपरोक्त पोलीस अधिकारी यांनीUNIFORM, I-CARD, SPORTS DRESS, SPORT SHOES, RELIEVING MEMO इत्यादीसाहित्य सोबत नेणे आवश्यक आहे.

२. उशिरा पोहचणा-या अधिका-यांना प्रशिक्षणास ॲडमिशन मिळणार नाही व त्यांना परतकरण्यात येईल. तसेच प्रशिक्षणा दरम्यान कोणतेही रजा किंवा परवानगी मिळणार नाही.

२. उपरोक्त प्रशिक्षणार्थीनी वैद्यकीय आपतकालीन परिस्थितीकरीता महाराष्ट्र कुटूंब कल्याण आरोग्य योजनाकार्ड सोबत नेणे आवश्यक आहे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**०१. पोआअ/विचौ-२/गैरहजर/कसुरी/अहवाल/वेतन-बंद/पोना-६६ मुसळे/१२९६/२०२४अमरावती शहर दिनांक ०६/०२/२०२४**

**संदर्भ-** ०१) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचेकडील जावक क्रमांक ३२२५/२०२३ दिनांक १२/१२/२०२३

०२) या कार्यालयाचे नोटीसक्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/गैरहजर/पोना-६६ मुसळे/१६५/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/०१/२०२४

### आदेश

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येतेकी, पोना/६६ श्याम मुसळे, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुनतुम्ही दिनांक २१/११/२०२३ पासुन वरिष्ठांनाकोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणेगैरहजर असल्याने निदर्शनास आले आहे. तसेचतुम्हालागैरहजर मधुन कर्तव्यावर हजरहोणेकरीता वरील संदर्भीय क्रमांक ०२ अन्वये नोटीस देवुन सुध्दातुम्ही अद्याप पावेतो कर्तव्यावर हजर झालेले नाही.तसेचसदर नोटीसतुम्हालातामील झाल्याबाबत तामील प्रत या कार्यालयात प्राप्त झालेली आहे.

तरी पोना/१६६ श्याम मुसळे, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहरहे दि.२१/११/२०२३ पासुनगैरहजर असल्याने नमुद पोलीस अंमलदारहेगैरहजर मधुन कर्तव्यावर हजरहोईपर्यंतत्यांचे मासिक वेतन बंद करण्यात येत आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

### निरंक

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस